महाराष्ट्र शासन
ग्रामविकास विभाग
बांधकाम भवन,२५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.

---

Email ID:- itcell-rdd@mah.gov.in संकेतस्थळ:- rdd.maharastra.gov.in
RTS-३८२६/प्र. क्र.१४९/मातंक दिनांक:- ११.०९.२०२६.

---

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय:-** दिनांक ०९.०९.२०२६ रोजी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतींमार्फत देण्यात येणाऱ्या सेवा व दाखल्यांबाबत ग्रामपंचायतनिहाय माहिती सादर करणेबाबत.

**संदर्भ**:- १) दिनांक ०९.०९.२०२६ रोजी मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली झालेली बैठक.

उपरोक्त विषय व संदर्भीय बैठकीच्या अनुषंगाने आपणास अवगत करण्यात येते की, दिनांक ०९.०९.२०२६ रोजी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागातील योजना व सेवांचे GPR (Government Process Re-engineering) करण्यासंदर्भात बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये, राज्यातील सर्व ग्रामपंचायतींमधून दिनांक ०१.०७.२०२६ ते आजअखेर किती दाखले/ सेवा ऑनलाईन तसेच ऑफलाईन पद्धतीने वितरित करण्यात आल्या आहेत, याबाबतची ग्रामपंचायतनिहाय माहिती तात्काळ शासनास सादर करण्याचे निर्देश मा. मुख्य सचिव यांनी दिलेले आहेत.

२. त्यानुसार, आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमार्फत (अ) या विभागाच्या अधिसूचित केलेल्या ७ सेवा आणि (ब) इतर प्रशासकीय विभागाच्या सेवा/दाखले याबाबत दिनांक ०१.०७.२०२६ पासून आजअखेर देण्यात आलेल्या दाखल्यांची/सेवांची ग्रामपंचायतनिहाय आकडेवारी शासनाला सादर करावयाची आहे.

३. याकरिता, सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये (प्रपत्र (अ) या विभागाच्या अधिसूचित केलेल्या ७ सेवा आणि (ब) इतर प्रशासकीय विभागाच्या सेवा/दाखले) माहिती भरून, ती दिनांक १५.०९.२०२६ पर्यंत उपरोक्त ईमेल आयडीवर एक्सेल स्वरूपात पाठविण्याबाबत संबंधितांना निर्देश द्यावेत.

४. सदर माहिती मा. मुख्य सचिवांच्या स्तरावर होणाऱ्या आढावा बैठकीत सादर करावयाची असल्याने, विहित मुदतीत अचूक माहिती उपलब्ध करून देण्याची दक्षता घ्यावी.

**(प्रशांत पाटील)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

# प्रपत्र 'अ' (Format A)

**विषय:** या विभागाच्या अधिसूचित केलेल्या ७ सेवा

**कालावधी:** दिनांक ०१.०७.२०२६ ते आजअखेर

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नाव | जन्म नोंद दाखला | | मृत्यू नोंद दाखला | | विवाह नोंद दाखला | | दारिद्र्य रेषेखालील असल्याचा दाखला | | ग्रामपंचायत येणेबाकी नसल्याचा दाखला | | नमुना ८ चा उतारा | | निराधार असल्याचा दाखला | | एकूण ऑनलाईन | एकूण ऑफलाईन | **वितरित केलेले एकूण दाखले/सेवा (ऑनलाईन+ऑफ लाईन)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | online | offline | online | offline | online | offline | online | offline | online | offline | online | offline | online | offline | | | |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

# प्रपत्र 'ब' (Format B)

**विषय:** इतर प्रशासकीय विभागाच्या सेवा/दाखले.

**कालावधी:** दिनांक ०१.०७.२०२६ ते आजअखेर

| अ.क्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायत | सेवेचे नाव / दाखल्याचे नाव | ऑनलाईन वितरित केलेले दाखले/सेवा | ऑफलाईन वितरित केलेले दाखले/सेवा | वितरित केलेले एकूण दाखले/सेवा (ऑनलाईन+ऑफलाईन) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | |
| २ | | | | | | | |
| ३ | | | | | | | |
| ४ | | | | | | | |
| ५ | | | | | | | |
| ६ | | | | | | | |
| ७ | | | | | | | |
| एकूण | | | | | | | |